## महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ

जा.क्र.मकां/कार्यक्रम/२०१९-२०/५८५
हुतात्मा बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार
क्रीडा भवन, सेनापती बापट मार्ग,
एल्फिन्स्टन, मुंबई ४०००१३.
दिनांक: २५/१०/२०१९

सुधारीत परिपत्रक:

**विषय:- विश्वकर्मा आदर्श कामगार पुरस्कार व कामगार भूषण पुरस्कार-२०१९**
**संदर्भ:- मकां/कार्यक्रम/२०१९-२०/५८१ दिनांक १८.०९.२०१९**

उपरोक्त विषयाला अनुसरून सर्व सहायक कल्याण आयुक्त, कामगार कल्याण अधिकारी व केंद्र प्रमुख यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियम १९५३ अंतर्गत मंडळाकडे कामगार कल्याण निधी भरणाऱ्या कामगार व कर्मचाऱ्यांना साहित्य, सामाजिक, शैक्षणिक, क्रिडा आदी क्षेत्रात योगदान देणाऱ्या कामगारांस मंडळाकडून विश्वकर्मा आदर्श कामगार पुरस्कार दिला जातो. तसेच विश्वकर्मा आदर्श कामगार पुरस्कार मिळाल्यानंतर पुढील १० वर्ष साहित्य, सामाजिक, शैक्षणिक, क्रिडा आदी क्षेत्रात योगदान देणाऱ्या कामगारांस मंडळाकडून कामगार भूषण पुरस्कार दिला जातो.

सन २०१९ या वर्षीचा विश्वकर्मा आदर्श कामगार पुरस्कार व कामगार भूषण पुरस्कार प्राप्त करण्यासाठी कामगार व कर्मचाऱ्यांकडून विहीत नमून्यात अर्ज मागविण्यात येत आहेत. सदरच्या पुरस्काराचे अर्ज, माहितीपत्रक, भिंतीपत्रके व कंपनीचा गोपनीय अहवाल इत्यादी स्वतंत्र पत्राने विभाग प्रमुखांना पाठविण्यात येणार आहेत. सदरचे अर्ज त्यांनी त्यांच्या स्तरावर गट व केंद्रांना उपलब्ध करून द्यावेत.

वरील संदर्भीय परिपत्रकाच्या अनुषंगाने सन २०१९ या वर्षीचा विश्वकर्मा आदर्श कामगार पुरस्कार व कामगार भूषण पुरस्कार प्राप्त करण्यासाठी कामगार व कर्मचाऱ्यांकडून अर्ज मागविण्याकरीता तारखा कळविण्यात आल्या होत्या त्यामध्ये बदल करण्यात येत असून अर्ज विक्री दिनांक १ नोव्हेंबर, २०१९ ते ३० नोव्हेंबर, २०१९ पर्यन्त करण्यात यावी व दिनांक १ नोव्हेंबर, २०१९ ते ३० नोव्हेंबर, २०१९ पर्यन्त अर्ज स्विकृती फक्त मध्यवर्ती कार्यालय, मुंबई येथे करण्यात येणार आहे.

तरी सर्व संबधित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी उपरोक्त पुरस्काराची माहिती कामगार कल्याण निधी भरणाऱ्या विविध आस्थापनातील कामगार व कर्मचाऱ्यांना देऊन प्रसिध्दी करावी.

Mayade
प्र.कल्याण आयुक्त

प्रत,

१) लेखा व लेखा परिक्षा अधिकारी, म.का.मुंबई.
२) लेखा अधिकारी/लेखा परिक्षा अधिकारी, म.का.मुंबई.
३) प्रसिध्दी व जनसंपर्क अधिकारी, मध्यवर्ती कार्यालय, मुंबई.
४) सर्व सहायक कल्याण आयुक्त / प्र.सहायक कल्याण आयुक्त, सर्व विभागीय कार्यालये.
५) सर्व सहायक लेखा अधिकारी, सर्व विभागीय कार्यालये.

Gunvant 2019

Scanned by CamScanner

६) कामगार विकास अधिकारी,कामगार कल्याण भवन,नागपूर/पुणे.

७) सर्व कामगार कल्याण अधिकारी,सर्व गट कार्यालये ★★★

८) सर्व केंद्र प्रमुख,सर्व कामगार कल्याण केंद्र.

★★★ यांनी सदरचे परिपत्रक सर्व केंद्र प्रमुखांना उपलब्ध करून द्यावे.

Scanned by CamScanner

# महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ

**मध्यवर्ती कार्यालय :** हुतात्मा बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवन, सेनापती बापट मार्ग,
प्रभादेवी रेल्वे स्टेशन जवळ, मुंबई - ४०० ०१३. दुरध्वनी क्र.: ०२२ ४३२२६८००

## कामगार भूषण पुरस्कार व विश्वकर्मा आदर्श कामगार पुरस्कार - २०१९

महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियम १९५३ अंतर्गत मंडळाकडे कामगार कल्याण निधी (LWF) भरणाऱ्या कामगार/कर्मचा-यांकडून कामगार भूषण पुरस्कार व विश्वकर्मा आदर्श कामगार पुरस्कार प्राप्त करण्यासाठी विहीत नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत.

अर्जदार कामगाराने पुढील नियम व अटी नुसार अर्ज भरून आवश्यक त्या प्रमाणपत्राच्या प्रतीसह कल्याण आयुक्त, महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ, हुतात्मा बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवन, सेनापती बापट मार्ग, एलफिन्स्टन, मुंबई - ४०० ०१३ यांच्याकडे आपल्या व्यवस्थापनाच्या शिफारशीसह दिनांक **३० नोव्हेंबर २०१९** पर्यंत सायंकाळी ५-३० पूर्वी / पर्यंत पोहचेल असा पाठवावा. यानंतर प्राप्त अर्जाचा विचार करण्यात येणार नाही.

## नियम व अटी

१. अर्जदार कामगाराने मंडळा मार्फत दिल्या जाणा-या विहित नमुन्यात अर्ज करणे बंधनकारक राहील.

२. अर्जासोबत १ स्वतःचा पासपोर्ट आकाराचा फोटो अर्जावर चिकटवावा व एक फोटो स्वतंत्र जोडावा.

३. विश्वकर्मा आदर्श कामगार पुरस्कारासाठी कमीत कमी ५ वर्षे सेवा असणे आवश्यक आहे.

४. कामगार भूषण पुरस्कारासाठी मंडळाचा गुणवंत कामगार कल्याण पुरस्कार मिळाल्यानंतर १० वर्षे सेवा झालेली असावी.

५. अर्ज हा स्वच्छ व परिपुर्ण भरलेला असावा. अपूर्ण अर्जाचा विचार केला जाणार नाही.

६. अर्जासोबत वेतन पावती / रेशनकार्ड / शैक्षणिक दाखले / कुटुंब नियोजन केल्याचा दाखला इ. आवश्यक असलेली कागदपत्र अर्जात नमुद केल्या प्रमाणे जोडणे आवश्यक आहे.

७. जोडलेली सर्व सत्यप्रती-कागदपत्र ही साक्षांकित केलेली असणे आवश्यक आहेत किंवा स्वयं साक्षांकन प्रति जोडण्यात याव्यात व सत्यतेबाबत स्वयं साक्षांकनासाठी स्वयं घोषणापत्र सोबत जोडावे.

८. व्यवस्थापनेचा गोपनीय अहवाल व्यवस्थापने कडून सीलबंद व गोपनिय लखोट्यात असावा.

९. पोलीस दाखला हा अर्जा सोबत मुळ प्रतीत जोडावा. अथवा मुलाखतीच्या वेळी सादर करावा.

१०. पुरस्कारासाठी कोणत्याही प्रकारचा राजकीय दबाव किंवा अन्य दबाव आणल्यास सदर व्यक्ती पुरस्कारासाठी अपात्र ठरविली जाईल.

११. अर्जात दिलेली कोणतीही माहिती खोटी असल्यास अथवा मंडळाची दिशाभूल केल्यास दिलेला पुरस्कार परत घेण्याचा अधिकार मंडळास राहील आणि अशा अर्जदारास मंडळाच्या कोणत्याही पुरस्कारा करीता अर्ज करता येणार नाही. त्यांना कायम स्वरूपी अपात्र ठरविले जाईल.

१२. व्यवस्थापनेने दिलेली कामगार अर्जदारा विषयीची माहिती खोटी आढळून आल्यास अशा व्यवस्थापनेने केलेली शिफारस रद्द करून पुढील ३ वर्षा पर्यंत त्या व्यवस्थापनेने केलेली अन्य कामगाराविषयाची शिफारस विचारात घेतली जाणार नाही.

१३. अर्जामध्ये खोटी माहिती, खोटी प्रमाणपत्र देणा-या व्यक्ती, तसेच व्यवस्थापनेने केलेली चुकीची शिफारस इ. बाबी आढळल्यास त्यांच्या विरूध्द योग्य ती कायदेशीर कारवाई केली जाईल.

१४. काही अडचणीमुळे सेवानिवृत्ती, स्वेच्छानिवृत्ती स्विकारलेल्या अथवा आर्थिक अडचणीमुळे बंद झालेल्या उद्योगास माहे डिसेंबर २०१९ पर्यंत ३ वर्षे वा त्या पेक्षा कमी कालावधी होत असल्यास अशा व्यवस्थापनेतील कामगाराने केलेला अर्ज ग्राह्य मानला जाईल. मात्र कंपनी बंद होण्यापुर्वीचा कामगार कल्याण निधी (LWF) भरणा केल्याचा पुरावा जोडणे आवश्यक आहे.

१५. महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियम १९५३ अन्वये वेतनातून कामगार कल्याण निधी (LWF) कपात केलेली माहे जून २०१९ ची वेतनाची पावती किंवा आस्थापनाचा दाखला अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

१६. ज्या अर्जदाराला पुरस्कार मिळाला नाही, अशा सर्व अर्जदारांचे अर्ज पुरस्काराची यादी जाहीर झाल्यानंतर एका महिन्याने ते त्यांना मागणीनुसार परत केले जातील.

१७. अर्जाची किंमत कामगार भूषण पुरस्कारासाठी रू. २००/- व विश्वकर्मा आदर्श कामगार पुरस्कारसाठी रू १००/- अशी राहील.

१८. सन २०१९ करीता कामगार भूषण पुरस्कारासाठी निवड झालेल्या एका कामगारास रोख पारितोषिक म्हणून रू. २५०००/- स्मृतिचिन्ह व प्रशस्तीपत्र आणि विश्वकर्मा आदर्श कामगार पुरस्कारार्थींना रोख रू. १५०००/- स्मृतिचिन्ह व प्रशस्तीपत्र देवून सन्मानित केले जाईल.

१९. ज्या कारखान्यात / आस्थापनेत ५०० पर्यन्त कर्मचारी/कामगार संख्या असल्यास १ पुरस्कार व ५०० पेक्षा जास्त कर्मचारी/कामगार संख्या असल्यास २ पुरस्कार्थीची गुणवत्तेनुसार निवड करण्यात येईल.

२०. कामगार/कर्मचा-यांचा गोपनिय अहवाल कारखान्यांच्या/आस्थापनेचा प्रमुख, मुख्य कार्यकारी अधिकारी, (सि.ई.ओ.), व्यवस्थापक, व्यवस्थापक (मानव संसाधन) पेक्षा कमी दर्जाचा नसेल त्या अधिकाऱ्याकडूनच घ्यावा.

२१. विश्वकर्मा आदर्श कामगार पुरस्काराच्या अर्जाच्या फाईलमधील कागदपत्राची मर्यादा २०० व कामागर भूषण पुरस्काराच्या अर्जाच्या फाईलमधील कागदपत्राची मर्यादा ३०० राहील. त्यापेक्षा जास्त कागदपत्रे जोडू नये.

No. किंमत रू. १००/-

# महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ

## विश्वकर्मा आदर्श कामगार पुरस्कार - २०१९

फोटो

१. कामगाराचे संपूर्ण नाव : ______

२. पत्र व्यवहाराचा पत्ता : ______

______ पिन कोड [ | | | | | ]

भ्रमणध्वनी : [ | | | | | | | | | ] दुरध्वनी (एस.टी.डी.सह) [ | | | | | | | | | | | | ]

ई-मेल : ______

३. व्यवस्थापनेचे / कंपनीचे नांव व पत्ता : ______

(दूरध्वनी / फॅक्स / ई-मेल सह) ______

______

४. कामगाराने धारण केलेले पद ______

(नेमणूक तारीख, किती बढत्या मिळाल्या नमुद करावे) ______

५. सध्या काम करीत असलेल्या व्यवस्थापनेच्या सेवेत रूजू : ______
झाल्यापासून आज पर्यंतचा हजेरीपत्रकाचा तपशिल / ______
कामासंबधातील उपक्रमशिलता / योग्यता इ. बाबतचा ______
व्यवस्थापनेचा गोपनीय अहवाल (सोबत जोडलेल्या ______
नमुण्याप्रमाणे) सिलबंद पाकिटात जोडला आहे का ?

६. जन्म तारीख : ______

७. आधार कार्ड क्रमांक : [ | | | | | | | | | | | ]

८. शैक्षणिक पात्रता / तांत्रिक पात्रता (दाखले जोडावेत) : ______

______

९. अर्जदाराची कौटुंबिक माहिती : (अ) विवाहित / अविवाहित : ______
(ब) मुलांची संख्या दर्शवावी : ______
(क) रेशनकार्डाची प्रत जोडावी : ______

१०. कुटुंब नियोजन केले आहे का ? ______
असल्यास प्रमाणपत्र जोडावे. : ______

११. कामगाराने धारण केलेल्या पदाची संबधित जबाबदारी कोणती ? ______
कर्तव्याचा थोडक्यात तपशिल द्यावा. ______

______

१२. अर्जदाराने आपल्या निवासाच्या ठिकाणच्या पोलीस स्टेशनचे ______
वर्तणूकीचे प्रमाणपत्र जोडले आहे का ? (होय / नाही) ______

१३. कंपनीच्या उत्पादन वाढीसाठी आपण कोणते प्रयत्न केलेले आहेत ? ______
या बाबत स्वतंत्र टिप्पणी (व्यवस्थापनेने साक्षांकित केलेली) ______
सोबत जोडावी. ______

१३. मंडळाचा किंवा महाराष्ट्र शासनाचा किंवा केंद्र शासनाचा पुरस्कार मिळाला आहे का ? असल्यास कोणता पुरस्कार व त्याचे वर्ष.

१४. महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियम १९५३ अन्वये वेतनातून कामगार कल्याण निधी (MLWF) रक्कम कपात केली असल्यास माहे जून २०१९ ची वेतन पावती जोडली आहे. - होय / नाही.

१५. पुरस्कार प्राप्त करण्यासाठी अर्जदार हा सर्व बाजूंचा विचार करता तो त्या पुरस्कारासाठी पात्र असल्याचा खालील बाबींसह तपशिल द्यावा.

अ) सामाजिक

ब) शैक्षणिक

क) सांस्कृतिक

ड) साहित्यिक

इ) क्रीडा विषयक

ई) कामगार संघटना विषयक कार्य

(शासकीय आणि नोंदणीकृत संस्थेचीच प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येतील)

१६. शिफारस करणा-या अधिका-याचे नांव व हुद्दा, पत्ता, दूरध्वनी, ई-मेल द्यावा.

१७. सदर पुरस्कार मला का मिळावा ? या सबंधी अर्जदाराने ५०० शब्दांचे निवेदन जोडावे.

मी मंडळाचे नियम व अटी वाचल्या असून त्या मला मान्य आहेत. मी खात्रीपुर्वक नमुद करतो की, वरील दिलेली सर्व माहिती व सोबत जोडण्यात आलेली सर्व प्रमाणपत्र / कागदपत्र ही खरी आहेत. खोटी आढळून आल्यास सदर पुरस्कारास मी अपात्र राहीन याची मला जाणीव आहे.

ठिकाण :

दिनांक :

अर्जदाराची स्वाक्षरी

No. किंमत रू. २००/-

# महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ

## *कामगार भूषण पुरस्कार - २०१९*

फोटो

१. कामगाराचे संपूर्ण नाव : ______

२. पत्र व्यवहाराचा पत्ता : ______

______ पिन कोड : [ ][ ][ ][ ][ ][ ]

भ्रमणध्वनी : [ ][ ][ ][ ][ ][ ][ ][ ][ ][ ] दुरध्वनी (एस.टी.डी.सह) [ ][ ][ ][ ][ ][ ][ ][ ][ ][ ][ ][ ]

ई-मेल : ______

३. व्यवस्थापनेचे / कंपनीचे नांव व पत्ता : ______
(दूरध्वनी / फॅक्स / ई-मेल सह) ______

______

४. कामगाराने धारण केलेले पद ______

(नेमणूक तारीख, किती बढत्या मिळाल्या नमुद करावे) ______

५. सध्या काम करीत असलेल्या व्यवस्थापनेच्या सेवेत रूजू : ______
झाल्यापासून आज पर्यंतचा हजेरीपत्रकाचा तपशिल / ______
कामासंबधातील उपक्रमशिलता / योग्यता इ. बाबतचा
व्यवस्थापनेचा गोपनीय अहवाल (सोबत जोडलेल्या ______
नमुण्याप्रमाणे) सिलबंद पाकिटात जोडला आहे का ? ______

६. जन्म तारीख : ______

७. आधार कार्ड क्रमांक : [ ][ ][ ][ ][ ][ ][ ][ ][ ][ ][ ][ ]

७. शैक्षणिक / तांत्रिक पात्रता (दाखले जोडावेत) : ______

______

८. अर्जदाराची कौटुंबिक माहिती : (अ) विवाहित / अविवाहित : ______
(ब) मुलांची संख्या दर्शवावी : ______
(क) रेशनकार्डाची प्रत जोडावी : ______

९. कुटुंब नियोजन केले आहे का ? ______
असल्यास प्रमाणपत्र जोडावे. : ______

१०. कामगाराने धारण केलेल्या पदाची संबधित जबाबदारी कोणती ? ______
कर्तव्याचा थोडक्यात तपशिल द्यावा. ______

______

११. अर्जदाराने आपल्या निवासाच्या ठिकाणच्या पोलीस स्टेशनचे ______
वर्तणूकीचे प्रमाणपत्र जोडले आहे का ? (होय / नाही) ______

१२. कंपनीच्या उत्पादन वाढीसाठी आपण कोणते प्रयत्न केलेले आहेत ? ______
या बाबत स्वतंत्र टिप्पणी (व्यवस्थापनेने साक्षांकित केलेली) ______
सोबत जोडावी. ______

१३. आपणांस कोणत्या वर्षी गुणवंत कामगार कल्याण पुरस्कार देण्यात आला? ____________________

१४. गुणवंत कामगार कल्याण पुरस्कार मिळाल्यानंतर ____________________
गेल्या १० वर्षात आपण कोणकोणते उल्लेखनीय कार्य केले?
त्याची कागदपत्रासह माहिती द्यावी.

१५. महाराष्ट्र शासनाचा किंवा केंद्र शासनाचा ____________________
पुरस्कार मिळाला आहे का? ____________________
असल्यास कोणता पुरस्कार व त्याचे वर्ष. ____________________

१६. महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियम १९५३ अन्वये वेतनातून कामगार कल्याण निधी (MLWF) रक्कम कपात केली असल्यास माहे जून २०१९ ची वेतन पावती जोडली आहे. - होय / नाही.

१७. पुरस्कार प्राप्त करण्यासाठी अर्जदार हा सर्व बाजूंचा विचार करता तो त्या पुरस्कारासाठी पात्र असल्याचा खालील बाबींसह तपशिल द्यावा.

अ) सामाजिक ____________________

ब) शैक्षणिक ____________________

क) सांस्कृतिक ____________________

ड) साहित्यिक ____________________

इ) क्रीडा विषयक ____________________

ई) कामगार संघटना विषयक कार्य ____________________

(शासकीय आणि नोंदणीकृत संस्थेचीच प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येतील)

१८. शिफारस करणा-या अधिका-याचे नांव व हुद्दा, पत्ता, दूरध्वनी, ई-मेल द्यावा.
____________________
____________________

१९. सदर पुरस्कार मला का मिळावा ? या सबंधी अर्जदाराने ५०० शब्दांचे निवेदन जोडावे.
____________________
____________________

मी मंडळाचे नियम व अटी वाचल्या असून त्या मला मान्य आहेत. मी खात्रीपुर्वक नमुद करतो की, वरील दिलेली सर्व माहिती व सोबत जोडण्यात आलेली सर्व प्रमाणपत्र / कागदपत्र ही खरी आहेत. खोटी आढळून आल्यास सदर पुरस्कारास मी अपात्र राहीन याची मला जाणीव आहे.

ठिकाण : ____________________

दिनांक : ____________________ अर्जदाराची स्वाक्षरी

# महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ

## *कामगार भूषण पुरस्कार व*
## *विश्वकर्मा आदर्श कामगार पुरस्कार - २०१९*

## कंपनीचा गोपनीय अहवाल

अर्जातील अनु. क्र. ५ अन्वये कंपनीने लेटरपॅडवर खालील दाखला द्यावा.

१) कामगाराचे / कर्मचा-याचे नाव : ______________________

२) हुद्दा : ______________________

३) सेवेची नेमणूक तारीख : ______________________

४) सेवेत किती बढती मिळाल्या : ______________________

५) कंपनीच्या उत्पादन वाढीत सहभाग दिला आहे का ? : ______________________

६) कामगार / कर्मचा-याची वर्तणुक : ______________________

७) कंपनीतील हजेरी / उपस्थिती किती टक्के आहे : ______________________

८) सदर कामगार/कर्मचारी मंडळाचा सदरचा पुरस्कार घेण्यास पात्र वाटतो काय? (होय / नाही) : ______________________

९) आस्थापनेतील कामगार / कर्मचा-यांची एकूण संख्या : ______________________

१०) शिफारस करणा-या अधिका-याचे नाव व : ______________________

हुद्दा, दुरध्वनी / फॅक्स / ई-मेल ______________________

______________________

______________________

**शिफारस करणाऱ्या**
**अधिका-याची स्वाक्षरी व शिक्का**

(कृपया सदर अहवाल गोपनिय दस्ताऐवज म्हणून सिलबंद पाकीटात ठेवावा.)

प्रपत्र - ब

## स्वयं-साक्षांकनासाठी स्वयं घोषणापत्र

अर्जदाराचा फोटो

मी ______________________ श्री. ______________________

यांचा मुलगा / मुलगी वय ________ वर्ष, आधार क्रमांक : ______________________

व्यवसाय : ______________________ राहणार : ______________________

______________________ पिन कोड : | | | | | | |

याद्वारे घोषित करतो / करते की, मी स्वयं साक्षांकीत केलेल्या प्रती या मूळ कागदपत्रांच्याच सत्य प्रती आहेत. त्या खोट्या असल्याचे आढळून आल्यास, भारतीय दंड संहिता आणि / किंवा संबंधित कायद्यानुसार माझ्यावर खटला भरला जाईल व त्यानुसार मी शिक्षेस पात्र राहीन याची मला पूर्ण जाणीव आहे.

ठिकाण : ______________ अर्जदाराची सही : ______________

दिनांक : ____/____/ २०१९ अर्जदाराचे नांव : ______________